ISSN 2319 - 359X

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# IDEAL

Volume - X    Issue - I    September - February - 2021-22

Marathi / Hindi

Peer Reviewed Refereed and
UGC Listed Journal No. 47026

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.601
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

College • Late.Ramesh

VOLUME - X, ISSUE - I - SEPTEMBER - FEBRUARY - 2021-22
**IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 6.601** (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १५ | कोवीड-१९ आणि समाजाची भुमिका<br>**प्रा. बिडवे टी. एस.** | ७३-७६ |
| १६ | कोवीड-१९ काळातील जिल्हा प्रशासनाची भुमिका<br>**डॉ. यमलवाड जी. टी.**<br>**इरबतनवाड गोदावरी तुकाराम** | ७७-८२ |
| १७ | कोवीड-१९ आणि प्रसार माध्यमाची भुमिका<br>**प्रा. डॉ. कांबळे एम. एस.** | ८३-८५ |
| १८ | कोवीड-१९ जैविक आपत्तीत जिल्हा प्रशासनाची भूमिका<br>**डॉ. मुक्ता सोमवंशी** | ८६-८९ |
| १९ | कोरोना-१९ काळात उद्योग जगताची भुमिका व भारतीय अर्थव्यवस्था<br>**प्रा. डॉ. पी. डी. हुडेकर** | ९०-९५ |
| २० | स्थानिक स्वशासनाची भूमिका<br>**प्रा. डॉ. संजय संदिपान चव्हाण** | ९६-९८ |
| २१ | कोरोना महामारी आणि स्थलांतर<br>**डॉ. सुनिता आत्माराम टेंगसे** | ९९-१०४ |
| २२ | कोरोनामुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम<br>**प्रा. डॉ. अंभुरे एस. डी.** | १०५-१०८ |
| २३ | कोरोना महामारीचा भारतीय समाज व्यवस्थेवर झालेला परिणाम<br>**प्रविण शिवाजी घुगे** | १०९-११२ |
| २४ | कोविड-१९ काळातील स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका व विकास : एक विश्लेषणात्मक अभ्यास<br>**प्रा. डॉ. परशुराम पाटील** | ११३-११४ |


Late Ramesh Warpudkar College Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

VOLUME - X, ISSUE - I - SEPTEMBER - FEBRUARY - 2021-22
**IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 6.601** (www.sjifactor.com)

# २१. कोरोना महामारी आणि स्थलांतर

**डॉ. सुनिता आत्माराम टेंगसे**
समाजशास्त्र विभाग प्रमुख, कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय सोनपेठ, जि. परभणी.

## प्रस्तावना

माणसानं भूपृष्ठावर रेघा मारायला सुरुवात केली आणि स्थलांतर या कल्पनेचा उदय झाला. देशाच्या सीमा आखल्या गेल्या. एक सीमा ओलांडून दुसरीत प्रवेश केला, की वेगळे नियम पाळायचे आणि जे कुठल्याच रेघांच्या आत बसत नाहीत ते 'नो मॅन्स लँड'मध्ये राहतात म्हणून त्यांना कोणी वाली नाही. गंमत विचार करण्यासारखी अशी आहे, की बंधनं तोडून स्वतंत्र श्वास घेण्याची जितकी आंतरिक ओढ माणसाला असते तितकीच बंधनात राहायचीपण असते म्हणूनच.

स्थलांतर म्हणजे स्वातंत्र्य, बंधनमुक्ती. स्थलांतर म्हणजे नव्या जगात नवी सुरुवात. स्थलांतर म्हणजे परंपरेला दुरावणं विसरणं. स्थलांतर म्हणजे संस्कृतीची सरमिसळ.स्थलांतर म्हणजे काही कमावणं काही गमावणं. आज आपल्या रोजच्या जीवनातून चूल, बंब, उखळ, खलबता, जातं, मुसळ, पाटा, वरवंटा अशा अनेक गोष्टी हरवल्या आहेत. त्यांची जागा मिक्सर, ग्राइंडर, फूड प्रोसेसर या वस्तूंनी घेतली हा बदल सुख-सुविधा बरोबर घेऊन आला. त्याची सवय झाल्यावर हरवलेल्या वस्तूंचा काळानुसार विसर पडू लागला. तरीपण त्या गमावलेल्या वस्तू आपल्या परंपरेचा एक अविभाज्य भाग होता हे आपण कधीतरी आठवून आपल्या प्रगतीचा आलेख मोजतो. नवीन गवसल्याचा अभिमान मानतो. झालेलं स्थित्यंतर अंगवळणी पडतं. स्थलांतराचंही असंच आहे. स्थलांतराची ही वाट दूर जाते. स्वप्नांमधील गावा... आणि मग त्या स्वप्ननगरीत काही वर्ष वास्तव्य झाल्यावर लुकलुकणारे दूर दिवे गावाकडचे... मधूनच खुणावतात. त्यांचा मंद प्रकाश मंदावत जातो. विसरला जातो स्थलांतरामुळे होणारी स्थित्यंतरे व बदललेला दृष्टिकोन परत बदलता येत नाही. पंख फुटल्यावर भरारी मारणारी पाखरं पुन्हा घरट्यात येत नाहीत. घरटं जुनं झालेलं असतं.पैशाची-सुविधांची ज्ञानाची, स्वप्नपूर्तीची माणसाला ऊब लागते. त्यासाठी माणसं स्थलांतर करतात. हे स्थलांतर ऐच्छिक असते. काही वेळा राजकीय घडामोडींमुळे बदलेलं स्थलांतर अनैच्छिक असतं. माणूस ढकलला गेलाच की ओढला गेलाय यावर तो स्थलांतरित आहे, की निर्वासित आहे हे ठरविता येत.

## शोध निबंधाचा उद्देश

१. भारतीय राज्यघटना आणि स्थलांतराचा अधिकार या विषयी जाणून घेणे.



Late Ramesh Warpudkar College Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

२. स्थलांतर म्हणजे काय? हे जाणून घेने.

३. स्थलांतराची कारणे स्पष्ट कराने.

४. स्थलांतराची आवश्यकता मांडने.

५. स्थलांतर विकास प्रक्रिया आणि व्यवस्थापन अभ्यासने.

६. कोरोना महामारी मुळे झालेल्या स्थलांतराचे परिणाम अभ्यासने.

संशोधन पद्धती

प्रस्तुत शोधनिबंधात साठी दुय्यम तथ्य संकलन सामग्रीचा अवलंब करून विचारांची मांडणी करण्याचा प्रयत्न कर आहे.

गृहीतकृत्य

कोरिना माहामारीमुळे शहरी समुदायाकडून ग्रामीण समुदायाकडे होणाऱ्या स्थलांतरात वाढ झाली आहे.

भारतात स्थलांतर हे शतकानुशतके होत आले आहे. तरीही, १९४७ च्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर एक देश म्हणून आपली ओळख तयार झाल्यावर,स्थलांतराविषयीच्या आपल्या धारणा या एकसाची आणि गुंतागुंतीच्या झालेल्या आहेत.आपल्या राज्यघटनेने दिलेला देशांतर्गत कोठेही प्रवास-स्थलांतराचा अधिकार, तसेच देशातील अन्य राज्यात जाऊन स्थायिक होण्याचा हक्क यामुळे देशांतर्गत स्थलांतराच्या प्रक्रियेला न्यायमान्यता मिळाली. या घटनेतील तरतुदीमुळे देशातील तळागाळातील नागरिकांना खूप फायदा झाला. काहींनी जिथे पोट भरेल तिथे जाण्यासाठी स्थलांतर केले, तर कुणी आता राहत असलेल्या गावातील परिस्थितीला कंटाळून नव्या ठिकाणची वाट धरली. पण आपल्याकडे नोकरी-उपजीविका हा उद्देश सोडल्यास, सामाजिक आणि राजकीय स्तरावरील स्थलांतराचा तितकासा गांभीर्याने विचार होत नाही.

कोणत्याही स्थलांतराच्या अनेक बाजू असतात. राष्ट्र, भाषा, जात/जमात, श्रद्धा, अस्मिता, त्यांचे राजकारण आणिबाजारपेठेवर - अर्थकारणावर प्रभाव टाकणाऱ्या वेगवेगळ्या सामाजिक गुंतागुंती इत्यादी मुद्द्यांवर मूळचे आणि बाहेरचे यांच्यात होणारा संघर्ष आणि नंतरचे जुळवून घेणे या प्रक्रिया वर्षानुवर्षे चालणाऱ्या प्रक्रिया आहेत. अनेकदा समाजातील या स्थलांतराच्या, समाजात मिसळून जाण्याच्या किंवा जुळवून घेण्याच्या प्रक्रिया अनेकदा दुर्लक्षित केल्या जातात.मानववंशशास्त्रामध्ये स्थलांतराचा अभ्यास कित्येक वर्षे केला जात आहे. डग्लस मेस्से या विख्यात समाजशास्त्रज्ञाने सांगितल्यानुसार, "समाजशास्त्राचा "समाजशास्त्राचा अभ्यास करतानां केवळ एकसारख्या किंवा एकाच प्रकारच्या उदाहरणांना ठेवून स्थलांतराचा अभ्यास होत नाही. त्यासाठी वेगवेगळ्या ज्ञानशाखांतून, वेगवेगळ्या प्रदेशांतील घडामोडींमधून

विचारसरणींमधून समोर आलेले मुद्दे व दृष्टिकोन यांचा सैद्धांतिक परामर्श स्थलांतराच्या इतिहास-समाजशास्त्राचा विचार करताना घ्यावा लागतो".

कोरोनासारख्या अनेक विषाणूंना किंवा अनेक नैसर्गिक आपत्तींना आपल्याला भविष्यात तोंड देण्याची तयारी आता करावीच लागणार आहे, त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञ-अभ्यासक करत आहेत. समाजशास्त्रीयदृष्ट्या आपल्या संस्कृतीला, देशाच्या आकृतिबंधाला संतुलित स्वरूपात जपून ठेवत विकास साधायचा असेल तर आपल्याला स्थलांतरे, विकासप्रक्रिया आणि व्यवस्थापन यांचे संतुलन साधणाऱ्या नवनव्या पद्धतींचा विचार करावाच लागेल. अन्यथा आपल्या ज्या संस्कृतीला आपण आपल्या अस्मितेच्या मानदंडाच्या अग्रस्थानी ठेवलेले असते त्या संस्कृतीचा चेहरामोहरा बदलून जाऊन, तिला जडत्व प्राप्त होण्याचा धोका फार दूर नाही. कोरोनाकाळातील स्थलांतरे आपल्याला हेच शिकवत आहेत, हे आपण वेळीच लक्षात घ्यायला हवे.

स्थलांतर म्हणजे काय?

स्थलांतर होताना केवळ स्थान बदलत नाही, तर स्थलांरितांच्या मनावर नवीन स्थानाचा आघात होत असतो. माणसाच्या गरजा फक्त खाण्याशी निगडित नसतात, तर त्याच्या परिस्थितीशी जुळवून घेण्यावर अवलंबून असतात. एकत्रित संस्कृती सोडून व्यक्तीकेंद्रीत संस्कृतीमध्ये आल्यावर जी ओढाताण होते. त्यानं मानसिक स्वास्थ्य बिघडतं. कोरोनाने स्थलांतराच्या प्रश्नाला नव्या स्वरुपात आपल्यापुढे आणले आहे. किमान आता तरी स्थलांतराच्या या मुद्द्यांचा धोरणकर्त्यांनी गंभीरपणे विचार करायला हवा.

स्थलांतराचे प्रकार

स्थलांतराचे दोन प्रकार असतात. देशातील एका राज्यातून दुसऱ्या राज्यात जाऊन स्थायिक होणे याला अंतर्गत स्थलांतर म्हणतात. स्वेच्छेने परदेशात जाऊन स्थायिक होणं याला देशांतर म्हणतात.

स्थलांतराची कारणे

जो कोणी आपला देश मागे ठेवतो तो लहरीपणाने तसे करीत नाही. युद्धे, नैसर्गिक आपती, राजकीय व वांशिक छळ आणि संधींचा अभाव ही प्रवासी चळवळीमागील काही कारणे आहेत आणि याचा परिणाम लोकांवर अगदी वेगळ्या मार्गाने होऊ शकतो.

1. राजकीय आश्रयस्थान

कधीकधी एखाद्या राज्यातील राजकीय परिस्थितीमुळे राजकीय असंतोषाविरूद्ध काही प्रमाणात दडपण येऊ शकते. या प्रकरणात, एखादा असंतुष्ट व्यक्ती बदला घेण्याच्या भीतीने (जसे कैद, अत्याचार इ.) देश सोडून जाण्याचा निर्णय घेऊ शकते. याला राजकीय आश्रय म्हणून ओळखले जाते.

2. मानवतावादी (किंवा आर्थिक) आश्रय

जेव्हा एखादी व्यक्ती गरिबीशी संबंधित कारणास्तव त्यांच्या मूळ देशातून स्थलांतर करण्याचा निर्णय घेते, तेव्हा त्याला सहसा मानवतावादी किंवा आर्थिक आश्रय म्हणून संबोधले जाते.

3. सांस्कृतिक स्थलांतर

कधीकधी, स्थलांतरितांनी उत्तम शिक्षण किंवा चांगल्या संधी शोधात त्यांचा मूळ देश सोडण्याचा निर्णय घेतला.

4. कौटुंबिक स्थलांतर

दुसऱ्या राज्यात राहणाऱ्या नातेवाईकांशी पुन्हा एकत्र येण्यासाठी प्रवासी आपला देश सोडून जाण्याचा निर्णय घेतल्यास, बहुतेकदा कौटुंबिक कारणास्तव स्थलांतर म्हणून संबोधले जाते.

5. लष्करी कारणांसाठी स्थलांतर

जेव्हा एखादा देश किंवा प्रदेश युद्धाचा संघर्ष करीत असतो तेव्हा लोक केवळ युद्धातून उद्भवलेल्या धोक्यातून मुक्त होण्यासाठी आपली घरे सोडण्याचा निर्णय घेऊ शकतात, केवळ त्याच्या पूर्णपणे हिंसक बाबीने नव्हे तर त्यास उद्भवणाऱ्या संसाधनांच्या कमतरतेमुळे.

6. मानवतावादी आपत्तीमुळे स्थलांतर

एखादा प्रदेश किंवा देश त्सुनामी किंवा भूकंपासारख्या नैसर्गिक आपत्तीने उध्वस्त झाला असेल तर त्या ठिकाणचे लोक अधिक स्थिर प्रांतात आपले जीवन पुन्हा निर्माण करण्यासाठी स्थलांतर करू शकतात.

स्थलांतर म्हणजे काय?

स्थलांतर होताना केवळ स्थान बदलत नाही, तर स्थलांरितांच्या मनावर नवीन स्थानाचा आघात होत असतो. माणसाच्या गरजा फक्त खाण्याशी निगडित नसतात, तर त्याच्या परिस्थितीशी जुळवून घेण्यावर अवलंबून असतात. एकत्रित संस्कृती सोडून व्यक्तीकेंद्रीत संस्कृतीमध्ये आल्यावर जी ओढाताण होते. त्यानं मानसिक स्वास्थ्य बिघडतं. कोरोनाने स्थलांतराच्या प्रश्नाला नव्या स्वरुपात आपल्यापुढे आणले आहे. किमान आता तरी स्थलांतराच्या या मुद्द्यांचा धोरणकर्त्यांनी गंभीरपणे विचार करायला हवा.

'स्थलांतर' हा माणसाच्या आजवरच्या इतिहासात कायमच महत्त्वाचा घटक राहिला आहे. आदीम काळापासून आजच्या कोरोना संकटापर्यंत माणसे सतत एका ठिकाणहून दुसऱ्या ठिकाणी जात राहिली आहेत. कधी संकटापासून दूर जाण्यासाठी तर कधी पोटाची खळगी भरण्यासाठी. या स्थलांतर करणाऱ्या माणसांशी तेथील मूळच्या लोकांसोबत झालेल्या संघर्षाच्या आणि सहकार्याच्या कहाण्यांनी माणसाचा

इतिहास भरलेला आहे. आज एकविसाव्या शतकात, वाढलेला प्रवासाचा वेग आणि संपर्काची क्रांती यामुळे या स्थलातंराचे नवेनवे पैलू सामोरे येत आहेत. स्थलातराचे हे गणित समजून घेतल्याशिवाय आता आपल्याला पुढे जाता येणेच अशक्य आहे. किमान भारताबाबत तरी याचा धोरणात्मक विचार करणे, आपल्यालासाठी तातडीचे ठरले आहे.

स्थलांतराची आवश्यकता

जन्मापासून प्रत्येकाला स्वातंत्र्याची आस असते. नाळ तोडून स्वतःचं स्वतंत्र आयुष्य जगण्याची धडपड असते; पण त्याच वेळी मिळालेल्या स्वातंत्र्याची भीती वाटत असते. जसं लहान मूल चालायला लागलं, की पुढं पुढं पळायला बघतं, नवीन जगाच्या अनुभवाला आसुसलेलं असतं; पण नवीन माणसं आणि नवीन जागा पाहिल्यावर घाबरून आईला येऊन बिलगतं. अशीच काहीशी मानसिक अवस्था स्थलांतरितांची असते. स्थलांतर ही स्वातंत्र्याची झेप असली, तरी सुरक्षित ओळखीचा परिसर व माणसं आणि समाजासाठी यापासून दुरावा निर्माण होऊ लागतो. नव्या परदेशी संस्कृतीशी होणाऱ्या संघर्षणामुळे स्थित्यंतर घडू लागतात. The Scarlett letter या पुस्तकाच्या प्रस्तावनेत नॅथनियल हॉथॉर्न स्थलांतरितांबद्दल लिहिते, पिढ्यान् पिढ्या एकाच मातीत काढलेलं पीक जमिनीचा कस कमी करतं. त्यामुळे नवीन येणारं पीक ज्याप्रमाणे उच्च प्रतीचं राहत नाही त्याप्रमाणे माणसाची प्रगती पिढ्यान् पिढ्या एकाच ठिकाणी राहून खुंटते.

सारांश

कोरोनाच्या संकटापासून वाचण्यासाठी आणि भविष्यातील आर्थिक मंदीच्या भीतीने आज लक्षावधी लोक मुंबई-दिल्लीसारख्या शहरातून आपल्या मूळ गावाकडे परत जात आहेत. वाहतुकीची तुटपुज्या व्यवथेमध्ये होत असलेल्या या स्थलांतराच्या कहाण्यांनी, काहींना थेट १९४७ च्या फाळणीच्या वेळी झालेल्या ऐतिहासिक स्थलांतराची आठवण येत आहे. ही सारे माणसे अशी का सैरभैर होताहेत, याचा मुळापसून अभ्यास करणे आजघडीला खूप महत्त्वाचे ठरले आहे. आजवर सारा गोंधळ होता हे जरी मान्य केले तरी, यापुढे तरी स्थलांतरासारख्या माणसाच्या या मूलभूत प्रेरणेचा शासनकर्त्यांनी गंभीरपणे विचार करणे आवश्यक आहे. कोरोनाच्या काळातील झालेली स्थलांतरे आणि त्या स्थलांतरप्रक्रियेत झालेल्या कामगारवर्गाच्या व त्यांच्या लेकराबाळांना भोगाव्या लागलेल्या हालअपेष्टा या वास्तवाला अधिक गडद करून गेल्या. या साऱ्यातून धडा घेऊन काही ठोस योजना आखणे आवश्यक आहे. त्यासाठी नागरिक-कामगारवर्ग-स्थलांतरित समूह आणि शिकून चांगली नोकरी करण्याचे स्वप्न पाहणारा युवावर्ग यांच्याशी संवाद साधणारी संवादकेंद्रे, समुपदेशन संस्था यांची तातडीने गरज आहे. यासोबतच अनौपचारिक नागरी

अर्थव्यवस्थांना चालते ठेवणारी अनौपचारिक क्षेत्रे व उपजीविकेचे उद्योग यांच्याकडे वळलेल्या निम्नमध्यमवर्गाच्या दृष्टीने काही परिणामकारक धोरणे राबवण्याची गरजदेखील आता अधिकाधिक अधोरेखित होऊ लागणार आहे.

संदर्भ सूची

१. डॉं. शामल देशमुख स्थलांतरित यांच्या समस्या पवन प्रकाशन परभणी 2015 पान न. 31ते 34

२. डॉं. भा की खडसे. भारतातील सामाजिक समस्या. मंगेश प्रकाशन नागपूर, 2009,पान.नं. 21 ते 23

३. प्रा. धारवाडकर, प्रा. भालेराव भारतीय समाज समकालीन समस्या रुद्राणी पब्लिकेशन हाऊस भोकर महाराष्ट्र. मे 2017 पान नं. 11, 12

४. 22/09, 10:21 pm] Dr.Sunita Aatmaram Tengse: https://www.orfonline.org/marathi/understanding-migration-in-context-of-covid-19-67722/[22/09, 10:21 pm] Dr.Sunita Aatmaram Tengse:

५. https://maharashtratimes.com/editorial/samwad/migration-and-immigrants/articleshow/58558989.cms [22/09, 10:21 pm] Dr.Sunita Aatmaram Tengse:

६. https://mr.warbletoncouncil.org/consecuencias-migracion-3455[22/09,10:21pm] Dr.Sunita Aatmaram Tengse:

७. https://mr.vikaspedia.in/social-welfare/938902935947926928936940932-91791f/93894d92593293e902924930-91694792194d92f93e915921942928-93693993093e915921947

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani